पुढारी | शनिवार
२९ सप्टेंबर २०१८

## विवेकानंद कॉलेजमध्ये हिंदी सप्ताह अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा

कोल्हापूर (प्रतिनिधी) : विवेकानंद कॉलेजमध्ये हिंदी विभागाच्या वतीने हिंदी सप्ताह अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. डॉ. राज चव्हाण, प्रा ए. एस कदम यांनी काम पाहिले. यावेळी डॉ. चव्हाण म्हणाले, वकृत्वामध्ये विषयाचे ज्ञान महत्वाचे असते. चांगला वक्ता होण्यासाठी देहबोली, भाषा प्रभुत्व, संदर्भ आवश्यक असतात. तर प्रा. कदम यांनी ववतृत्व कला सादर करताना विषयाची पूर्ण तयारी करणे गरजेचे आहे तसेच चांगला वक्ता होण्यासाठी उत्तम श्रोता होणे गरजेचे आहे असे सांगितले. स्पर्धेमध्ये सौरभ पाटील, नंदिनी काकडे, शाहिन मुल्ला यांनी अनुक्रमे प्रथम तीन क्रमांक पटकावले. यावेळी प्रा. डॉ. दीपक तुपे, प्राचार्य डॉ. एस वाय होनगेकर, डॉ. आरिफ महात आदी उपस्थित होते.

तरुण भारत
शनिवार, २९ सप्टेंबर २०१८

## 'विवेकानंद'च्या एनसीसी छात्रांकडून स्वच्छता मोहीम

कोल्हापूर : शासनाच्या 'स्वच्छता हीच सेवा" या उपक्रमांतर्गत विवेकानंद कॉलेजच्या एन. सी. सी. छात्रांनी रेल्वे स्टेशन परिसरात एकदिवसीय स्वच्छता मोहिम राबवली. यावेळी विद्यार्थ्यांनी स्टेशन परिसरात पडलेला प्लॅस्टिक कचरा, बाटल्या एकत्र गोळा करून स्वच्छता केली. या मोहिमेंतर्गत ५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या मोहिमेसाठी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, एन. सी. सी कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट डॉ. एस. जी. गावडे, रेल्वे स्टेशन मॅनेजर फर्नांडिस, मोहन शेटे आदींचे मार्गदर्शन लाभले.

तरुण भारत
शनिवार, २९ सप्टेंबर २०१८

## संसदीय कामकाज विषयावर परिसंवादास प्रतिसाद

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमधील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने भारतीय संसदीय कामकाज या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. या परिसंवादात संसदेच्या सभागृहात वर्तन, संसदेचे कामकाज, कामकाजातील विलंब, कामकाज व कागदपत्रांची भाषा, योग्य प्रतिनिधी निवडण्यात नागरिकांची भूमिका आदी विषयावर चर्चा झाली. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. डी. ए. पवार, प्रा. एस. डी. जोशी, प्रा. समिक्षा फराकटे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स
शनिवार, २९ सप्टेंबर २०१८

## सौरभ पाटील प्रथम

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजध्ये हिंदी दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत सौरभ पाटील याने प्रथम क्रमांक पटकावला. नंदिनी काकडे हिने द्वितीय तर शाहीन मुल्ला हिने तृतीय क्रमांक पटकावला. प्रा. डॉ. राज चव्हाण व प्रा.ए. एस. कदम यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांचे मार्गदर्शन लाभले.

ऐश्वर्या शहा हिने प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. दीपक तुपे यांनी आभार मानले.

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
KOLHAPUR-416003

1/10/18

Scanned by CamScanner

# तरुण भारत

मंगळवार, दि. २ ऑक्टोबर २०१८

## 'राष्ट्रीय एकात्मतेसाठी हिंदी भाषा आवश्यक'

कोल्हापूर : हिंदी भाषेने अनेक भाषांच्या शब्दांना आत्मसात केले आहे. ही बहुप्रांतीय भाषा आहे. या भाषेला गौरवशाली परंपरा लाभली आहे. त्यामुळे आपली संस्कृती, सभ्यता, संस्कार, मूल्य, मानवता इत्यादी जीवनमूल्ये सुरक्षित आहेत. हीच जीवनमूल्ये देश विदेशातील सर्व लोकांना एकतेच्या सुत्रात बांधून ठेवतात, असे प्रतिपादन विवेकानंद महाविद्यालयातील हिंदी विभागप्रमुख डॉ. माधवी जाधव यांनी केले. विवेकानंद महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने हिंदी सप्ताह उत्साहात साजरा करण्यात आला. यामध्ये विद्यार्थ्यांचे काव्यवाचन, भाषण व मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सप्ताहाचा समारोपप्रसंगी डॉ. माधवी जाधव यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. डॉ. जाधव म्हणाल्या माणसाची खरी ओळख ही त्याच्या मातृभाषेमुळे होत असते. हिंदी ही देशाची अस्मिता व आत्मसन्मान आहे. हिंदी भाषेचा भविष्यकाळ उज्ज्वल आहे. ४८ देशांमधील १५० विद्यापीठांमध्ये हिंदीचे अध्ययन, अध्यापन, संशोधन सुरू आहे. डॉ. आरिफ महात यांनी प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. एम. ए. पीरजादे, प्रा. बी. के. गावीत, डॉ. प्रभा पाटील, डॉ. राज चव्हाण आदी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

पुण्यनगरी
दि. १३.१०.२०१८

# विवेकानंद महाविद्यालयात प्रश्नमंजूषा स्पर्धा उत्साहात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

विवेकानंद महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने प्रश्नमंजूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. ही स्पर्धा 'हिंदी साहित्याचा इतिहास व वर्तमान संदर्भ' विषयावर आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेमुळे हिंदी साहित्यातील अनेक घटनांची उकल विद्यार्थ्यांना झाली व विद्यार्थ्यांच्या ज्ञानामध्ये भर पडली, यामुळे विद्यार्थ्यांना खऱ्या इतिहासाची ओळख झाली. विद्यार्थ्यांना इतिहासातील अनुभव आपल्या वर्तमानात कसे उपयोगी असतात या गोष्टीची प्रचिती आली. या स्पर्धेत नंदिनी काकडे, हनुमंत कांबळे, ऐश्वर्या शाह यांचा संघ विजेता ठरला. विजेत्या संघातील विद्यार्थ्यांचा पुस्तके देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन प्राचार्य एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभागाचे सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांनी केले. आभार सौरभ माने यांनी मानले. Pn.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

तरुण भारत
मंगळवार, ९ ऑक्टोबर २०१८

# विवेकानंदमध्ये हिंदी विभागाची प्रश्नमंजुषा प्रतियोगिता उत्साहात

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयाच्या हिंदी विभागाच्या वतीने प्रश्नमंजुषा प्रतियोगितेचे आयोजन करण्यात आले. ही प्रश्नमंजुषा प्रतियोगिता 'हिंदी साहित्याचा इतिहास वर्तमान संदर्भ' या विषयावर आयोजित करण्यात आली होती. विद्यार्थ्यांना इतिहासातील अनुभव आपल्या वर्तमानात कसे उपयोगी असतात या गोष्टीची प्रचिती आली. या स्पर्धेत नंदिनी काकडे, हनुमंत कांबळे, एश्वर्या शाह यांचा संघ विजेता ठरला. विजेता संघातील विद्यार्थ्यांना पुस्तके देवून सत्कार करण्यात आला. स्वागत ऋषिकेश भोसले याने केले. संयोजन प्रा. डॉ. एस. वाय होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक प्राध्यापक डॉ. दीपक तुपे यांनी केले. आभार सौरभ मोरे यांनी मानले. सुत्रसंचालन जयश्री पोवार हिने केले.

9/10/18

VIVEKANAND COLLEGE * ESTD JUNE 1964 * KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

पुढारी | सोमवार
१० डिसेंबर २०१८

## विवेकानंद कॉलेजमधील वादविवाद स्पर्धेत ऐश्वर्या शहा प्रथम

कोल्हापूर (प्रतिनिधी) : विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्या वतीने 'आनंदी जीवनासाठी पैशाचे महत्त्व आहे की नाही?' या विषयावर वादविवाद स्पर्धा झाली. या स्पर्धेत प्रथम क्रमांक ऐश्वर्या शहा, द्वितीय पूजा शेळके, तृतीय प्रज्ञा कुकडे यांनी मिळविला. स्पर्धेचे परीक्षण मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी यांनी केले. अजय कांबळे यांनी प्रास्ताविक केले. जयश्री पोवार यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. डॉ. दीपक तुपे यांनी केले. या स्पर्धेत बी. ए. भाग १, २, ३ मधील विद्यार्थी सहभागी झाले होते. P

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । सोमवार, १० डिसेंबर २०१८

## 'विवेकानंद'मध्ये वादविवाद स्पर्धा

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्यावतीने 'आनंदी जीवनासाठी पैशाचे महत्त्व आहे की नाही' या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत ऐश्वर्या शहा हिने प्रथम, पूजा शेळके हिने द्वितीय, प्रज्ञा कुकडे हिने तृतीय



क्रमांक मिळविला. या प्रसंगी स्पर्धेचे परीक्षक म्हणून मराठी विभाग प्रमुख प्रा. बी. के. गोसावी यांनी काम पहिले. स्पर्धेचे प्रास्ताविक अजय कांबळे यांनी केले. जयश्री पोवार हिने आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली हिंदी विभागातील प्रा. डॉ दीपक तुपे यांनी केले. स्पर्धेत कला शाखेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. मटा

10/12/18

VIVEKANAND COLLEGE
ESTD JUNE 1964
KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

लोकमत कोल्हापूर, मंगळवार, दि. ११ डिसेंबर २०१८

# विवेकानंद महाविद्यालयात वादविवाद स्पर्धेचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागाच्यावतीने आनंदी जीवनासाठी पैशाचे महत्त्व आहे की नाही? या विषयावर वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये ऐश्वर्या शहा यांनी प्रथम क्रमांक मिळविला, तर पूजा शेळके द्वितीय व प्रज्ञा कुकडे यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

या स्पर्धेचे परीक्षक मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी म्हणाले, धनापेक्षा मनाची श्रीमंती माणसाला प्रतिष्ठा प्राप्त करून देते. आनंदी जीवन जगण्यासाठी धन महत्त्वाचे नसून माणुसकी महत्त्वाची आहे. वादविवाद स्पर्धेतून विद्यार्थ्यांना वर्तमानकाळात पैशाचे महत्त्व, साधनसामग्री आणि त्याचे फायदे-तोटे, माणसाच्या माणुसकीचे मोठेपण यावर विचारमंथन झाले. स्पर्धेचे अजय कांबळे यांनी प्रास्ताविक केले, तर जयश्री पोवार यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. दीपक तुपे यांनी केले. स्पर्धेत बी. ए. भाग १, २, ३च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

लोकमत कोल्हापूर, मंगळवार, दि. ११ डिसेंबर २०१८

# 'विवेकानंद'मध्ये भित्तीपत्रकांचे प्रदर्शन

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयातील रसायनशास्त्र विभागामध्ये आयोजित भित्तीपत्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांच्या हस्ते झाले. बी. एससी.भाग-३ (रसायनशास्त्र)मधील विद्यार्थी, विद्यार्थिनींनी पर्यावरण, संरक्षण, ग्लोबल वॉर्मिंग, हवा, माती, पाणी प्रदूषण, आदींवर भित्तीपत्रिका तयार केल्या होत्या. रसायनशास्त्र विभागप्रमख डॉ. डी. बी. पाटील आदींचे त्यांना मार्गदर्शन लाभले.

VIVEKANAND COLLEGE
ESTD JUNE 1964
KOLHAPUR-416 003

सकाळ
कोल्हापूर, मंगळवार, ११ डिसेंबर २०१८

# 'विवेकानंद'मध्ये वादविवाद स्पर्धा

कोल्हापूर : विवेकानंद महाविद्यालयात हिंदी विभागातर्फे आनंदी जीवनासाठी पैशाचे महत्त्व आहे की नाही? यावर वादविवाद स्पर्धा झाल्या. ऐश्वर्या शहा, पूजा शेळके, प्रज्ञा कुकडे यांनी यश मिळविले. मराठी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी यांनी मनोगत व्यक्त केले. अजय कांबळेने प्रास्ताविक केले. जयश्री पोवारने आभार मानले. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, प्रा. डॉ. दीपक तुपे यांनी संयोजन केले.

12/12/18

Scanned by CamScanner

पुढारी | कोल्हापूर, शनिवार ८ सप्टेंबर २०१८

# हिंदी विषयाच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या अमर्याद संधी : प्रा. सुतार

**कोल्हापूर ( प्रतिनिधी):** देश, विदेशात हिंदी विषय मोठ्या प्रमाणावर शिकवला जातो. सर्व माध्यमांमध्ये हिंदी भाषेसाठी रोजगाराच्या अमर्याद संधी उपलब्ध आहेत. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातही हिंदीच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळेच हिंदी हा रोजगाराच्या संधी निर्माण करणारा विषय बनला, असे प्रतिपादन प्रा. विश्वनाथ सुतार यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित हिंदी विषयाच्या व्याख्यानात ते बोलत होते. हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. आर. तुपे यांनी आभार मानले. P

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

महाराष्ट्र टाइम्स । कोल्हापूर । रविवार, ९ सप्टेंबर २०१८

118

## हिंदी हा रोजगाराचा वटवृक्ष : प्रा. सुतार

कोल्हापूर : 'अनुवाद, फिल्म, रेडिओ, दूरदर्शन, विविध चॅनेल्स, साहित्य, शिक्षण अशा अनेक क्षेत्रांमध्ये हिंदीच्या विद्यार्थ्यांना रोजगार मिळू शकतो. त्यामुळे हिंदी हा रोजगाराचा वटवृक्ष आहे,' असे प्रतिपादन प्रा. विश्वनाथ सुतार यांनी केले. विवेकानंद कॉलेजमध्ये हिंदी विभागाच्यावतीने आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर होते. प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, वेब प्रसार माध्यमांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. मातृभाषा मराठी, राष्ट्रभाषा हिंदी, आंतरराष्ट्रीय भाषा इंग्रजी या तीन भाषांवर जो प्रभुत्व मिळवतो त्याला जगात कुठेही रोजगार मिळू शकतो हे लक्षात ठेवून विद्यार्थ्यांनी तयारी करावी, असे आवाहन प्रा. सुतार केले. हिंदी विभागप्रमुख डॉ. आरिफ महात यांनी स्वागत केले. डॉ. डी. आर. तुपे यांनी आभार मानले. जयश्री पोवार यांनी सूत्रसंचालन केले.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner

पुढारी | सोमवार
२२ ऑक्टोबर २०१८

# 'विवेकानंद'मध्ये संत नामदेवांचे योगदान विषयावर व्याख्यान

कोल्हापूर ( प्रतिनिधी ) :संत नामदेवांनी वारकरी सांप्रदायाच्या माध्यमातून भक्ती प्रसाराबरोबर समाजा बांधणीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. म्हणूनच त्यांना संत साहित्यामधील भक्त शिरोमणी म्हटले जाते, असे प्रतिपादन प्रा. बी. के. गोसावी यांनी केले.विवेकानंद महाविद्यालयात हिंदी विभागाच्या वतीने आयोजित 'संत नामदेवांचे योगदान' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. दीपक तुपे होते. प्रास्ताविक नंदिनी काकडे हिने केले. सूत्रसंचालन हणमंत कांबळे यांनी केले. डॉ. ए. एस. महात यांनी आभार मानले.

पुण्य नगरी ▮ सोमवार, २२ ऑक्टोबर २०१८

# संत नामदेवांच्या योगदानावर व्याख्यान

कोल्हापूर / प्रतिनिधी :

विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागातर्फे 'मध्यकाळात संत नामदेव यांचे योगदान' विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विभागप्रमुख प्रा. बी. के. गोसावी यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. तुपे होते. यावेळी प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर, नंदिनी काकडे, ए. एस. महात, हणमंत कांबळे, संदीप पाटील, विकास मस्के उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

Scanned by CamScanner